# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्र.प्र.ले./वित्त/प्रकल्प/४० दिनांक: १८.०२.२०१८

विषय: महानगरपालिकेतील कंत्राटदारांकडून घ्यावयाच्या अतिरिक्त सुरक्षा ठेव (ASD) व कार्यानुरूप हमीपत्रा (PG) बाबत.

संदर्भ: १) एमडीडी/७८७८ दि.२७.०९.२०१६

२) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/१९ दिनांक १५.०९.२०१७

महापालिकेतील निविदांसाठी Standard Bid Document जारी करण्यात आले असून त्यामध्ये दिलेल्या निर्देशांनुसार निविदाकारानी उणे १२% पेक्षा अधिक सवलतीच्या दराने देकार दिला असल्यास Standard Bid Document मधील मार्गदर्शक सुत्रानुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव (ASD) भरणे आवश्यक आहे. तसेच यशस्वी निविदाकाराकडून Standard Bid Document मधील मार्गदर्शक सुत्रानुसार कार्यानुरूप हमीपत्र (PG) घेण्यात येते.

दिनांक २२ऑगस्ट,२०१७ रोजीच्या शासकिय अधिसूचनेद्वारे कार्य कंत्राटांवरील वस्तु व सेवाकराचा दर १८टक्के ऐवजी १२टक्के असा करण्यात आल्याने महापालिकेने परिपत्रक क्र. प्र.ले.वित्त/प्रकल्प/शहर/१९ दि.१५.०९.२०१७ अन्वये मार्गदर्शक सुचना प्रसृत केलेल्या आहेत. त्यानुसार ज्या निविदा दिनांक १ जुलै, २०१७ ते दिनांक २१ ऑगस्ट,२०१७ या दरम्यान सादर झाल्या आहेत व ज्या शासकिय कार्यकंत्राटासाठी वस्तु व सेवाकराचा दर १८टक्के वरून १२टक्के झालेला आहे अशा निविदांमध्ये निविदाकाराकडून ६ टक्के दर कमी करून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

अशा प्रकारे वस्तु व सेवाकराच्या दरातील कपातीमुळे निविदाकाराकडून कमी करण्यात आलेल्या/येणाऱ्या दरावर अतिरिक्त सुरक्षा ठेव/परफॉर्मस गॅरंटी घ्यावी किंवा कसे याबाबत विविध खात्यांकडून विचारणा करण्यात येते. याबाबत असे सुचित करण्यात येते की, कंत्राटदाराने अशा प्रकारे कमी केलेला दर हा केवळ कर दरातील कपातीमुळे म्हणजेच Anti Profiteering Measure च्या अनुषंगाने असल्याने, त्यानुसार कमी होणाऱ्या देकारावर, त्याप्रमाणात अतिरिक्त सुरक्षा ठेव (ASD)/ कार्यानुरूप हमीपत्र (PG) घेण्याची आवश्यकता नाही.

उदा. दिनांक २० ऑगस्ट, २०१७ या देय दिनांकास मागविलेल्या, रू.१ कोटी इतक्या कार्यालयीन अंदाजाच्या निविदेवर, क्ष निविदाकाराने उणे १५ टक्के दराने निविदा सादर केली व त्यासोबत ३टक्के (१५-१२) दराने रू.३ लाख इतकी अतिरिक्त सुरक्षा ठेव Online Payment द्वारे जमा केली. वरिल परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, या कार्यकंत्राटातील वस्तु व सेवाकराचा दर १८ टक्केवरून १२ टक्के झाल्यामुळे,

निविदाकाराने ६ टक्के करकपातीचा फायदा महापालिकेस वर्ग करून, त्याचा देकार त्या प्रमाणात कमी केला. या प्रकरणी निविदाकाराकडून वाढीव अतिरिक्त सुरक्षा ठेव/ वाढीव कार्यानुरूप हमीपत्राची मागणी न करता, त्याने उणे १५ टक्के या मुळ देकारानुसार निविदा सादर करताना भरलेली अतिरिक्त सुरक्षा ठेव आणि दिलेले कार्यानुरूप हमीपत्र ग्राह्य धरावे.

सर्व खातेप्रमुख/सहाय्यक आयुक्त/रूग्णालय अधिष्ठाता/वैद्यकिय अधिक्षक/ उपप्रमुख लेखापाल/लेखा अधिकारी यांनी उपरोक्त सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी.

(रा.क.आव्हाड)
प्रमुख लेखापाल(पा.पु.म.नि.)

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त)प्र.

(राम धस)
उप आयुक्त(म.ख.खा.)

(डॉ.संजय मखर्जी)
अतिरिक्त आयुक्त(प्रकल्प)

(अजोय मेहता)
महानगरपालिका आयुक्त